<u>**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१**</u>

मी शपथेवर सत्यकथन करतो की,
माझे नांव - दादू सुजय चक्रवती,
वय - ४९ वर्षे, धंदा- रिक्षा ड्रायव्हर,
राहणार - भिमनगर, भिंगार, अहमदनगर.

<u>**सरतपास अभियोगतर्फे सरकारी वकील श्री. पी.ए. कुलकर्णी यांच्यातर्फे**</u>

**०१.** मला दिनांक १४/१२/२०२३ रोजी पोलिसांनी नगर - बु-हाणनगर रोडलगत, मातोश्री हॉटेलच्या आडोशाला, नागरदेवळे शिवार, अहमदनगर येथे बोलावले नव्हते. माझ्या समक्ष पोलिसांनी आरोपीकडून काहीही जप्त केले नव्हते. मी आरोपीला ओळखत नाही. मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर असलेली पंच क्र. १ वरील सही माझी आहे. मला पंचनाम्यातील मजकुराबाबत माहिती नाही. पंचनाम्यावरील सही क्र. १ ला **निशाणी ९** देण्यात येते.

<u>**(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकिलांनी साक्षीदाराला उलटतपासात सुचविणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली-परवानगी मंजूर.)**</u>

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १४/१२/२०२३ रोजी पोलिसांनी नगर - बु-हाणनगर रोडलगत, मातोश्री हॉटेलच्या आडोशाला, नागरदेवळे शिवार, अहमदनगर येथे जप्ती पंचनाम्यातील पंच क्र.१ म्हणून बोलावले होते. हे खरे नाही की, त्यावेळी दुसरा पंच ईरफान उमर शेख हा हजर होता. हे खरे नाही की, त्याठिकाणी माझयासमक्ष त्याला जागेवर पकडले व त्याचे नांव गांव विचारले असता त्याने आपले नांव राजेंद्र अशोक बोरुडे असल्याचे सांगीतले होते. हे खरेनाही की, माझयासमक्ष त्याची झडती घेतली तेव्हा आरोपीच्या ताब्यामधून प्लॅस्टीकच्या पिशवीमध्ये ११ सिलबंद बॉबी संत्रा देशी दारुच्या बाटल्या असा एकुण ७७०/- रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. जप्त करण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष जप्ती पंचनामा पोलिसांनी तयार केला व त्यावर माझी घटनास्थळावर पंच क्र.१ म्हणून सही घेतली. हे खरे नाही की, त्यानंतर माझ्यासमक्ष जप्त मुद्देमालामधून १८० मि.ली.ची एका बाटलीमध्ये रासायनीक विश्लेषणासाठी पाठविण्यासाठीचा नमुना काढून घेतला व त्यावर माझ्या सहीचे लेबल चिकटविले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझ्या ओळखीचा असल्याने त्याला वाचविण्याकरिता मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. बी.एन. पुंड यांचेकडून**</u> **-**

**०३.** नाकारला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

(एल.एस.पाढेण)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.३, अहमदनगर.

दिनांक – ०७/०४/२०२५.